महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
■ इलेक्ट्रिकल सुपरवायझर ■ इलेक्ट्रिकल वायरमन ■ टू-व्हीलर मेकॅनिक ■ A.C. मेकॅनिक ■ कॉम्प्युटर ऑपरेटर
■ ॲटोमोबाईल टेक्निशियन ■ मोटार वायडिंग ■ फोर व्हीलर मेकॅनिक ■ वेल्डर / फ्लंबर ■ कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल / व्हॉट्सॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ११९ वा | शुक्रवार, दि. ०५ डिसेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# निवडून दिले आहे म्हणजे सगळे अधिकार तुमच्याकडे आहेत असं नाही

## तपोवन वृक्षतोडी वरुन पेटलं रान! सयाजी शिंदेंनी काढले सरकारचे वाभाडे

**नाशिक (कटूसत्य वृत्त):-** यंदा नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळा होणार असून याची प्रशासनाकडून जोरदार तयारी केली जात आहे. कुंभमेळ्यासाठी तपोवनासाठी वृक्षतोडीचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे जोरदार वाद निर्माण झाला. वृक्ष तोडून याठिकाणी तपोवन तयार केले जाणार असल्याने पर्यावरण प्रेमी, नागरिक आणि अनेक अभिनेत्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. याबाबत अभिनेते आणि समाजिक कार्यकर्ते सयाजी शिंदे यांनी सरकार विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. निवडून दिले आहे म्हणजे सगळे अधिकार तुमच्याकडे आहेत असं नाही, अशी स्पष्ट भूमिका सयाजी शिंदे यांनी घेतली आहे.

तपोवनाच्या वृक्षतोडीच्या विरोधात अभिनेते सयाजी शिंदे यांनी सरकारवर हल्लाबोल केला. सयाजी शिंदे म्हणाले की, मी जागरूक नाशिककरांना पाठिंबा द्यायला गेलो होते. जिथे झाडं तुटतील तिथे आपण उभं राहिलं पाहिजे. उजाड माळरानाच्या ठिकाणी आम्ही झाडं लावणार. तिथे झाडं नाहीत, कारण तिथली माती चांगली नाही. तिथे कुंभ मेळा भरवला पाहिजे. निवडून दिलं म्हणजे म्हणजे सगळे अधिकार



तुमच्याकडे आहेत असं नाही. सर्वसामान्य माणसाचा विचार केला पाहिजे. मोठी झाडं तोडायची आणि नवीन झाडं लावायची हे चूक आहे. काही माणसं मारायची आणि त्यांना मूल बक्षिस म्हणून द्यायचं, अस कुठे होतं का," अशा शब्दांत सयाजी शिंदे यांनी सवाल उपस्थित केला.

वृक्षतोडीविरोधात भूमिका घेत अभिनेते सयाजी शिंदे म्हणाले की, राजकारणाबदल माझा अभ्यास नाही, पण झाडाबद्दल राजकारण करू नका. अजितदादांनी पाठिंबा दिला तसा भाजपच्याही काही लोकांनी पाठिंबा दिला आहे. 50 फूटी झाडं तोडायची आणि त्या बदल्यात नवी झाडं लावायची.. एवढी मोठी पळवाट शोधू नका. चुकीचा निर्णय होता कामा नये. सगळी झाडे जगली पाहिजेत. झाडांचा आधी विचार नंतर माणसांचा विचार केला पाहिजे. सगळं आनंदाने व्हावं, असे स्पष्ट मत सयाजी शिंदे यांनी व्यक्त केले.

### त्यांना त्याचं लखलाभ...

पुढे ते म्हणाले की, 'साधू आले-गेले काही फरक पडत नाही, पण झाडं गेली तर फरक पडतो, असं वक्तव्य सयाजी शिंदेंनी केलं होतं. त्यावर गुणरत्न सदावर्ते यांनी साधू-संतांचा अपमान सहन करणार नाही, असं म्हटलं होतं. त्यावर आपण आपले बरे आहोत तिथे खरे, असं प्रत्युत्तर सयाजी शिंदेंनी दिलं. बाकीचे लोक काय बोलतात, त्यांचं त्यांनाच धन्यवाद. त्यांना त्याचं लखलाभ, मला त्याच्याबद्दल काही बोलायचं नाही', असंही ते म्हणाले आहेत. त्याचबरोबर सयाजी शिंदे यांच्या भूमिकेला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पाठिंबा दिला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सयाजी शिंदे यांच्या वृक्षतोडीच्या भूमिकेला पाठिंबा दिला आहे. अजित पवार यांनी लिहिले आहे की, 'तपोवनातील वृक्षतोडीच्या संदर्भात समोपचारानं तोडगा काढला पाहिजे. यासंदर्भात अभिनेते सयाजी शिंदे यांनी घेतलेली भूमिका पर्यावरण हिताची आहे. विकासाबरोबर पर्यावरणाचा समतोल राखणं ही देखील काळाची गरज आहे. पर्यावरण वाचलं तरच पुढची पिढी सुरक्षित राहील, हे आपण सर्वांनी लक्षात ठेवलं पाहिजे,' असे मत अजित पवारांनी व्यक्त केले.

# ५ डिसेंबरला सर्व शाळा सुरू राहणार!

## बंद ठेवल्यास शिक्षकांचा पगार कापला जाणार

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालनालयाने ५ डिसेंबर २०२५ रोजी होणारे शाळा बंद आंदोलन रोखण्याचे आदेश दिले आहेत. मुख्याध्यापक महामंडळाने आपल्या मागण्यांसाठी हे राज्यव्यापी आंदोलन पुकारले होते.

मात्र, विद्यार्थ्यांचे हित जपण्यासाठी शाळा बंद ठेवू नयेत, असे स्पष्ट निर्देश





शिक्षण संचालनालयाने दिले आहेत. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, ज्यात एका दिवसाच्या वेतनाच्या कपातीचाही समावेश आहे. महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाने आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी ५ डिसेंबर रोजी राज्यव्यापी संप पुकारला होता. या संदर्भात पुण्यात झालेल्या बैठकीत सर्व शाळा एक दिवस बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या आंदोलनादरम्यान, प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयांवर मोर्चे काढण्यात येणार आहेत. आता शिक्षण विभागाच्या तंबीनंतर शिक्षक संघटना कोणती भूमिका घेणार हे ५ डिसेंबर रोजी कळेल.

### शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निर्देश -

या पार्श्वभूमीवर, शिक्षण संचालनालयाने विभागीय सहसंचालक, जिल्हा शिक्षण अधिकारी (माध्यमिक) आणि शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (मध्य व दक्षिण) यांना विशेष निर्देश दिले आहेत. ५ डिसेंबर २०२५ रोजी कोणतीही शाळा बंद राहणार नाही, याची खात्री करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांचे हित सर्वोपरी असल्याचे या पत्रात अधोरेखित केले आहे. आदेशाचे पालन न करणाऱ्या मुख्याध्यापक, शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शाळा बंद आढळल्यास, त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निर्देश आहेत. यामध्ये एका दिवसाच्या वेतनाच्या कपातीचाही समावेश आहे. ही कारवाई संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या स्तरावर करावी आणि हा आदेश सर्व शाळांपर्यंत पोहोचवावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### कोण-कोण आंदोलनात भाग घेणार?

या नियोजित आंदोलनाची माहिती शिक्षण संचालनालयाला विविध वृत्तपत्रांतील बातम्या, महाराष्ट्र राज्य खाजगी शिक्षण संस्था कृती समितीचे निवेदन, दत्तात्रय सावंत यांचे १ डिसेंबर २०२५ रोजीचे पत्र आणि महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संस्था महामंडळाचे १ डिसेंबर २०२५ रोजीचे निवेदन यांसारख्या संदर्भांमधून मिळाली, अशी माहिती शिक्षण संचालनालयाने दिली आहे. हे आंदोलन सरकारी अनुदानित, अंशतः अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आयोजित केले होते. राज्यातील सर्व स्तरांवरील कर्मचारी या आंदोलनात सहभागी होणार होते.

विकणे /भाड्याने देणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३
पत्ताः अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

# सोलापूरात रविवारी मातंग समाज उद्योजकता कार्यशाळा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** क्रांती गुरु लहुजी साळवे यांची जयंती आणि भारतीय संविधान दिनानिमित्त मातंग समाज कृती समिती आणि मातंग बिजनेस असोसिएशन शाखा सोलापूर यांच्या वतीने मातंग समाज उद्योजकता कार्यशाळा रविवार दि. 7 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 11 वाजता सोलापुरातील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा अध्यक्ष युवराज पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.



मातंग समाजातील तरुण वर्ग शिक्षणाकडे वळाला आहे. त्यांना शैक्षणिक, व्यावसायिक, नोकरी संदभार्तील मार्गदर्शन आवश्यक आहे. मातंग समाजातील तरुणांना रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून धेनू टेक सोल्युशन्स पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष खवळे, मातंग बिजनेस ग्रुपचे डॉ. पांडुरंग साबळे हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी मातंग समाज कृती समिती शहर अध्यक्ष ॲड. शैलेशकुमार पोटफोडे, मातंग समाज कृती समिती जिल्हा अध्यक्ष युवराज पवार, मातंग बिजनेस असोसिएशन शाखा सोलापूर प्रा. डॉ. दिगंबर झोंबाडे, रमेश बोराडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या कार्यशाळेचा अधिकाधिक तरुणांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस ॲड. शैलेश पोटफोडे, युवराज पवार, राजू क्षीरसागर, प्रा. दिगंबर झोंबाडे, रमेश बोराडे, हिरालाल आडगळे, शिवाजी गायकवाड, विकी पवार, प्रभाकर कांबळे, श्रीकांत देडे, शशिकांत डोलारे, अमोल पोटफोडे आदी उपस्थित होते.

# पीक नुकसानीवर केंद्रीय कृषी मंत्र्यांचे २४ तासांत घुमजाव

## कर्जमाफीसाठी दोन निवेदने मिळाल्याने गोंधळ

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे झालेल्या प्रचंड पीक नुकसानीसाठी राज्य सरकारने केंद्राकडे मदतीसाठी कोणतेही निवेदन पाठवले नसल्याचे विधान केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी मंगळवारी संसदेत केले आणि महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली.

हिवाळी अधिवेशनाच्या तोंडावर हे घडल्याने, महायुती सरकारला विरोधकांनी धारेवर धरलं. मात्र टीका सुरू होताच आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी याबाबत सोशल मीडियावर पोस्ट केल्यानंतर, केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी बुधवारी २७ नोव्हेंबर रोजी राज्याकडून निवेदन प्राप्त झाल्याचे स्पष्ट करत आपल्या विधानात बदल केला.

वृत्तानुसार, राज्याने पीक नुकसानीच्या संदर्भात दोन निवेदन केंद्राकडे पाठवले आहेत. यापैकी एक २७ नोव्हेंबर रोजी आणि दुसरे १ डिसेंबर रोजी पाठवले



गेले. राज्याच्या अंदाजानुसार, हे नुकसान जवळपास १०,००० कोटी रुपयांच्या घरात आहे. राज्य सरकारने केंद्राला दिलेल्या निवेदनात १ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीतील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा उल्लेख केला. यानुसार, ८४ लाख हेक्टरवरील पीक नष्ट झाले तर १.१ कोटी शेतकऱ्यांना याचा फटका बसला आहे.

यापूर्वी ऑक्टोबरमध्ये राज्याचा प्राथमिक अंदाज ६८.७ लाख हेक्टर पीक नष्ट झाल्याचा होता, पण 'पंचनामे' पूर्ण झाल्यावर नुकसानीची ही व्याप्ती खूप मोठी असल्याचे स्पष्ट झाले. राज्याने दोन निवेदन पाठवले असले तरी, केंद्राकडून मदतीची अंतिम रक्कम निश्चित करण्यापूर्वी केंद्र सरकारसोबत अनेक बैठका आणि चर्चा होतील, असं अधिकाऱ्यांनी म्हटलं.

### राज्याची मदत आणि कर्जाचा मुद्दा

राज्यातील अधिकाऱ्यांनी सांगितले की, पाऊस थांबायला वेळ लागल्याने पंचनामे पूर्ण करण्यास उशीर झाला. मात्र, राज्य सरकारने आतापर्यंत जवळपास १४,००० कोटी रुपयांची मदत वितरित केली आहे. यापूर्वी ऑक्टोबरमध्ये सरकारने ३१,६२८ कोटी रुपयांचे विक्रमी मदत पॅकेज जाहीर केले होते, ज्यात पीक नुकसानीसोबतच पायाभूत सुविधांच्या नुकसानीसाठीही तरतूद करण्यात आली होती.

या घटनेनंतर विरोधी पक्षांनी सत्ताधारी महायुतीला लक्ष्य केले आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी केलेली पोस्ट आणि केंद्रीय मंत्र्यांनी बदललेले विधान, यामुळे केंद्राकडून मदतीचा ओघ सुरू होण्यास होत असलेल्या विलंबावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी कर्जमाफी आणि तातडीच्या मदतीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

### जमिनीच्या नुकसानीसाठी विशेष मदत

सप्टेंबर दरम्यान मराठवाड्यात झालेली अतिवृष्टी इतकी तीव्र होती की अनेक ठिकाणी शेतातील माती वाहून गेली आहे. यासाठी राज्य सरकार प्रती हेक्टर *४७,००० आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून ३ लाख पर्यंतची मदत पुरवत आहे.

निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा ॲण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार

नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

# सीएनजी पुरवठा दोन दिवसांत सुरळित करा- पाटील

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एमआयडीसीने नोटीस दिल्यानंतर चिंचोली एमआयडीसीतील सीएनजी पंप मंगळवारपासून बंद करण्यात आला आहे. सोलापूर व परिसरातील सीएनजीच्या वाहनांसाठी या पंपावरून हमखास गॅस मिळत होता. आता हाच पंप झाल्याने आज दिवसभर सीएनजीचा तुटवडा प्रकर्षाने जाणवला.

सीएनजी मिळत नसल्याने सोलापूर शहर व जिल्ह्यातील सीएनजी वाहनधारकांची तारांबळ उडाली आहे. जिल्ह्यातील सीएनजी पुरवठा दोन दिवसात सुरळीत करा, अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिल्या आहेत.

चिंचोली एमआयडीसीतील आयएमसी कंपनीच्या सीएनजी पंपाला परवानगी नसल्याने एमआयडीसीने ९ लाख रुपयांचा दंड ठोठावत या पंपाला नोटीस दिली आहे. सात दिवसात आयएमसीने म्हणणे मांडावे अशी सूचना एमआयडीसीने केली आहे. सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील सीएनजी पंप गेल्या दोन दिवसांपासून बंद असल्याने वाहनधारकांचे मोठे हाल होत आहेत. सीएनजी मिळत नसल्याने वाहनधारक हैराण झाले असून गैरसोय लवकर संपवावी अशी मागणी होत आहे.

वाढत्या गर्दीमुळे आणि उपलब्धतेअभावी नागरिकांची होत असलेली गैरसोय लक्षात घेऊन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी आज तातडीने आयएमसी कंपनीच्या प्रतिनिधींशी बैठक घेतली. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीला जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी शिवाजी राठोड, आयएमसी कंपनीचे विभागीय व्यवस्थापक मंथन शहा उपस्थित होते.

### महापालिका प्रशासनाकडून एनओसी मिळण्याची गरज

सोलापूर शहर व जिल्ह्यासाठी लागणारा सीएनजी चिंचोली एमआयडीसीत तयार केला जातो. सीएनजीचा कच्चा माल एलएनजी दाभोळ येथील डेपोतून टँकरद्वारे आणला जातो. रोज साधारणता १५ टनाच्या सहा टँकरमधून एलएनजी चिंचोलीत आणला जातो. दाभोळ येथून एलएनजी घेऊन जाणाऱ्यांची संख्या वाढल्याने सोलापुरला वेळेवर एलएनजी पुरवठा होत नाही.

चिंचोली येथे असलेल्या एलएनजी टू सीएनजी प्रकल्पाची क्षमता प्रतिदिन ७५ ते ८० टन एवढी आहे. या प्रकल्पाचा विस्तार केला जात आहे. या शिवाय सोलापूर शहरात बुधवार पेठेतही आयएमसीकडून सीएनजी प्रकल्प उभारला जात आहे. या प्रकल्पाला महापालिकेची एनओसी आवश्यक असल्याचेही आयएमसीच्या अधिकाऱ्यांनी या बैठकीत सांगितले.

### साठवणुकीला परवानगी, विक्रीला नाही

एमआयडीसीमध्ये सीएनजी साठवणूक करायला आणि एलएनजीचे रुपांतरण सीएनजीमध्ये करण्यासाठी आयएमसी कंपनीला परवानगी आहे. या ठिकाणी किरकोळ स्वरुपात पंपाद्वारे सीएनजी विकरी करण्यास आयएमसी कंपनीला परवानगी नाही. आयएमसीने परवानगी मागितल्यास त्यांना आम्ही परवानगी देऊ, आतापर्यंत जवळपास ३ वर्षे त्यांनी विना परवाना पंप चालविल्या प्रकरणी केलेला ९ लाख रुपयांचा दंड भरणे आवश्यक असल्याचेही एमआयडीसीचे अधिकारी राठोड यांनी सांगितले.

## संपादकीय

# निवडणूक आयोग 'जोकर'

निवडणूक आयोगाचा 'जोकर' आणि लोकशाहीचा छिन्नविछिन्न होत चाललेला चेहरा, महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सुरूवातीपासूनच गोंधळ, गडबड, पुढे ढकलणे, स्थगिती आणि राजकीय हस्तक्षेप यांच्या सावल्या पडल्या. पण गेल्या काही दिवसांत जे दृश्य उघड्यावर आले, त्याने लोकशाहीची प्रतिष्ठा कोणाच्या हातात आहे आणि तिचा खेळ कोण खेळत आहे, हे स्पष्ट झाले आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सत्ताधारी मंडळी 'उपट' शैलीतील आश्वासने देत आहेत. निवडणुका जिंकण्यासाठी नाही, तर त्या जिंकताना होणारा खर्च परत मिळवण्यासाठी. हे आश्वासनांचे ओझे सरकारी तिजोरीवर पडावे, अशी त्यांची अपेक्षा. परंतु सरकारची तिजोरी रिकामी असताना खासगी तिजोऱ्या मात्र तुडुंब भरलेल्या दिसतात; आणि त्या तिजोऱ्यांतूनच 'लक्ष्मीदर्शनाचा' खेळ उभारला जातो.

या खेळाला अधिकृत शिक्कामोर्तब देण्याचे काम आता निवडणूक आयोगाकडून होताना दिसते. जो संस्थात्मकदृष्ट्या सर्वाधिक स्वायत्त राहायला हवा, तोच राजकीय दबावाच्या टेबलाखाली बसून जोकराची भूमिका वठवत आहे, हे पाहून संताप येतो. मतदारांना अमिषांचा पाऊस पडत असताना, काही तासांवर निवडणुका असताना, १२ जिल्ह्यांतील निवडणुका अचानक पुढे ढकलणे, हे केवळ 'गोंधळ' नव्हे, तर पूर्वनियोजित रणनीती आहे. कोणाचा फायदा करायचा आणि कोणाचा तोटा करायचा याचा नेमका हिशेब करुनच ही सराईत चाल आखली गेली आहे, हे दिसून येते.

मुख्यमंत्री फडणवीस राज्य निवडणूक आयोगावर अचानक संतापले. हा संताप लोकशाही रक्षणाच्या चिंता म्हणून रंगवण्याचा प्रयत्न होता. पण या नाटकाचा तिसरा अंक पूर्णतः फसला कारण जनता मूर्ख नाही. तिला हे दिसते की निवडणुका जवळ येतात, तेव्हा अमिषे वाढतात. मतदारांच्या घरट्यांवर 'लक्ष्मी दर्शन' होते... आणि त्यानंतर निवडणूक आयोग योग्य तो निर्णय न घेता उलट गोंधळ निर्माण करणारी पावले उचलतो.

निवडणूक आयोग स्वायत्त आहे, न्याय्य आहे, पक्षपात न करणारा आहे, हा भ्रम आता उरलेला दिसत नाही. आयोगाने ज्या पद्धतीने या सगळ्या प्रकरणात तटस्थतेचे कवच सोडले, तो लोकशाहीवरील विश्वास डळमळीत करणारा आहे. कारण मत खरेदी, ताकद, धमक्या आणि सरकारी यंत्रणेचा प्रभाव पाडणारा म्हणून वापर या सर्वांचा अंतिम फायदा ज्याला मिळावा अशी राजकीय योजनाच या गोंधळामागे आहे.

याच खेळात महाविकास आघाडी असो वा महायुती राजकारणी सगळेच हात धुवून घेत आहेत. परंतु सत्ताधारी बाजूवर अधिक दोष येतो, कारण निर्णयांचे नियंत्रण त्यांच्या हातात आहे. लोकशाही म्हणजे नियमबद्धता, पारदर्शकता आणि सर्वांना समान संधी. पण आज या सगळ्याचा घात निवडणूक आयोगाच्या निष्क्रीयतेमुळे आणि सरकारच्या अति-सक्रिय हस्तक्षेपामुळे होत आहे.

आजची खरी चिंता ही निवडणूक आयोग स्वतःचे स्वातंत्र्य गमावून बसला आहे का? लोकशाहीच्या प्रक्रियेत 'लक्ष्मीदर्शन'ला मान्यता देणारी संस्कृती निर्माण होत आहे का? आणि जनतेचा मतदानाचा हक्क हा आता फक्त सत्तेच्या अंकगणितातील एक आकडा उरला आहे का?

हा खेळ थांबायला हवा. लोकशाहीचे रक्षण करण्याची जबाबदारी सर्वप्रथम संस्थांची असते, सरकारची नाही, पक्षांची नाही, तर निवडणूक आयोगाची. पण जर त्यानेच जोकराची भूमिका स्वीकारली, तर लोकशाहीच्या रंगमंचावर कोण उभे राहणार? जनतेने हे पाहिले आहे, समजले आहे आणि लक्षात ठेवले आहे, आजून 'तूर्त इतकेच'.. पण हिशेबाचा दिवस दूर नाही.

## मागेल त्याला 'सौर कृषिपंप' योजनेत महाराष्ट्राचा विश्वविक्रम

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राने 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेत विश्वविक्रम केला आहे. महावितरणने एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौर कृषिपंप स्थापित करण्याचा उच्चांक केला आहे. या विक्रमाची गिनिज बुकमध्ये यशस्वी नोंद झाली आहे. गिनीज बुकतर्फे विश्वविक्रम प्रमाणपत्र प्रदान सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार, दि. ५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता छत्रपती संभाजीनगरच्या शेंद्रा एमआयडीसीमध्ये ऑरिक सिटी मैदानावर आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, अपारंपरिक ऊजार्मंत्री अतुल सावे, छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट, ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

शेतकऱ्यांना केवळ दहा टक्के रक्कम भरून सौर पॅनल्स आणि कृषिपंप असा संपूर्ण संच देण्याच्या ह्यमागेल त्याला सौर कृषिपंपह्ण या योजनेत महाराष्ट्राने आघाडी घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ह्यमागेल त्याला सौर कृषिपंपह्ण योजनेच्या अंमलबजावणीवर भर दिला आहे. संपूर्ण देशात महाराष्ट्राने सर्वाधिक सौर पंप बसविण्याचा उच्चांक गाठला आहे. ह्यमागेल त्याला सौर कृषिपंपह्ण योजनेत शेतकऱ्यांना प्रधानमंत्री कुसुम योजनेच्या अंतर्गत केंद्र सरकारकडून ३० टक्के तर राज्य सरकारकडून ६० टक्के अनुदान मिळते. त्यामुळे केवळ दहा टक्के रक्कम भरून सिंचनासाठी कृषिपंपासह संपूर्ण संच मिळतो. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना केवळ ५ टक्के लाभार्थी हिस्सा भरावा लागतो.

राज्यात साडेदहा लाख सौर कृषिपंप बसविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यामुळे कृषीपंपासाठी पैसे भरून वीज जोडणीची प्रतीक्षा करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचा 'पेड पेंडिंग'चा प्रश्न सुटणार आहे. 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेसाठी महावितरणने स्वतंत्र पोर्टलची निर्मिती केली आहे. शेतकऱ्यांनी पंपासाठी ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर महावितरणकडून अर्ज मंजूर केला जातो. त्यानंतर शेतकऱ्याने त्याचा हिस्सा भरायचा असतो. शेतकऱ्याकडून पंप बसविण्यासाठी एजन्सीची निवड केली जाते. पंप बसविण्याच्या ठिकाणाची महावितरण, एजन्सी व शेतकरी अशी तिघांकडून संयुक्त पाहणी केली जाते, त्यानंतर कार्यादेश दिला जातो आणि शेतात पंप बसविला जातो. पंप बसविणाऱ्या एजन्सीवर पुढच्या काळात देखभाल दुरुस्तीचीही जबाबदारी आहे.

सौर पॅनल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ शेतकऱ्यांना कृषिपंपाचे वीजबिल येत नाही. हे पंप पारंपरिक वीजपुरवठ्यावर अवलंबून नसल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे दिवसा कधीही सिंचन करता येते. त्यामुळे दिवसा वीजपुरवठ्याची शेतकऱ्यांची मागणी पूर्ण होते.

## माणूस माणसासारखा का वागत नाही?

एकेकाळी पृथ्वीतलावर प्रत्येक माणूस माणसासारखा वागायचा, माणसासारखे वर्तन करायचा, एकमेकांच्या संकटात व सुखदुःखात वाऱ्याच्या वेगाने धावून जायचा. समाजकार्यात, लग्नकार्यात व इतर सामाजिक कार्यक्रमात माणूस निस्वार्थ भावनेने काम करायचा. गावातील कोणता व्यक्ती मरण पावला तर अख्खा गाव त्याच्या अंत्यविधीला जमायचा आणि ढसाढसा रडायचा. तेव्हा आपले आणि परके असा भेदभाव केला जात नव्हता. समाज बांधव व समस्त गावकरी आपलेच वाटायचे. एखाद्या स्त्रीवर वा महिलेवर जाणीवपूर्वक अन्याय होत असेल तर अख्खा गाव त्या पीडित महिलेला न्याय मिळवून देण्यासाठी तिच्या बाजूने खंबीरपणे उभा राहायचा, आणि त्या महिलेला न्याय मिळवून द्यायचा आणि माणुसकीची शोभा वाढवायचा. प्रत्येक माणूस आपल्याकडून माणुसकी कलंकित होणार नाही, याची खबरदारी घ्यायचा. भलेही तेव्हाचा माणूस तेवढा सुशिक्षित नव्हता पण आजच्या सुशिक्षित माणसाला लाजवेल असे वागायचा. हल्ली माणूस खूप शिकला आहे, भरपूर पुस्तके वाचला आहे, पदवीधर होऊन सुद्धा माणसाला माणसासारखे वागता येत नाही, हीच शोकांतिका आहे. एवढे शिकून सवरून जर माणूस माणसासारखे वर्तन करत नसेल, परस्त्रीकडे वासनांध व वखवखलेल्या दृष्टिकोनातून बघत असेल तर मला वाटते माणूस शिक्षण शिकूनही न शिकल्यासारखा आहे. म्हणजे आजच्या सुशिक्षित माणसांपेक्षा पूर्वीची अडाणी माणसेच लाख पटीने बरी होती. हल्ली माणूस एवढा शिकला आहे, अनेक पदव्या घेऊन बसला आहे. पण त्याच्यातली माणुसकी अजूनही जिवंत झाली नाही. पूर्वी माणसातील माणुसकी बावन्न कशी सोन्यासारखी चकाकत होती. माणूस माणुसकीला जिवापाड जपायचा. आपल्या वर्तनातून माणुसकी ओशाळणार नाही व आपल्या हातून अमानुष कृत्य घडणार नाही, याची जीवापाड काळजी माणूस घ्यायचा. त्याकाळी माणूस स्त्रियांकडे व महिलांकडे स्वच्छ व नितळ नजरेने बघायचा. परस्त्रीला मातेसमान मानायचा व दुसऱ्याच्या मुलीला आपली बहीण समजायचा. तेव्हा बलात्कार, व्याभिचार, अनाचार आणि अत्याचाराचे प्रमाण खूप कमी होते. तेव्हा घरोघरी एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात होती. एका घरातील सर्व भाऊ एकत्र येऊन शेती करायचे, तेव्हा प्रत्येकाला भावाचा मुलगा आपलाच वाटायचा आणि भावाची मुलगी सुद्धा आपलीच वाटायची. तेव्हा आई-वडिलांना दैवत मानणारे सुपुत्र अस्तित्वात होते. त्याकाळी आई वडिलांना आपल्याकडे ठेवण्यासाठी सख्खे भाऊ एकमेकांना भांडायचे आणि आता आई-वडिलांना माझ्याकडे नको तर तुझ्याकडे ठेव म्हणून भाऊ एकमेकांना भांडत आहेत. अशी विदारक परिस्थिती सध्या सर्वत्र पाहायला मिळत आहे. पूर्वी आताच्या एवढे भांडण तंटे घरोघरी होत नव्हते. पूर्वीची माणसे खूप मायाळू व समजदार होती. नोकरदार भाऊ आपल्या शेतकरी भावाला शेतीचा व घराचा हिस्सा मागत नव्हता. उलट शेतकरी भावाच्या मुलाचा व मुलीचा शिक्षणाचा व लग्नाचा सारा खर्च सारायचा. म्हणून तेव्हा सगळीकडे मानवता आनंदाने नांदायची. माणूस माणसासारखा वागायचा. आपल्या शिलाला व चारित्र्याला जिवापाड जपायचा. परंतु हल्ली माणूस माणसासारखा का वागत नाही? माणसासारखे वर्तन व माणसासारखे कृत्य का करत नाही? आई-वडिलांना म्हातारपणात न सांभाळता वृद्धाश्रमात का पाठवत आहे? माणूस एवढा हैवान व नराधम कसा काय बनलाय? शाळेत शिकायला असताना माणूस प्रार्थना करायचा की, भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत, माझ्या देशावर माझे प्रेम आहे. अशी प्रतिज्ञा प्रत्येक जण शालेय जीवनात असताना करायचा. परंतु एकीकडे सारे भारतीय माझे बांधव आहेत, माझ्या देशावर माझे प्रेम आहे, अशी प्रतिज्ञा घ्यायची आणि दुसरीकडे आपल्याच देशातील मुलींवर बलात्कार करायचे, त्यांच्याकडे वासनांध नजरेने बघायचे आणि इकडे म्हणायचे सारे भारतीय माझे बांधव आहेत. हे असे कसे चालेल हो? तीन वर्षाच्या चिमूरडीपासून ते 80 वर्षाच्या वृद्ध म्हातारी पर्यंत बलात्कार करण्यासाठी हल्ली माणूस लिंग पिसाट झाला आहे. देशात बलात्काराचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. कोणत्या नात्यासोबत कसा व्यवहार करायचा असतो याचे आजकालच्या लिंग पिसाट युवकांना भान राहिले नाही. माणूस बहीण बघत नाही, भावाची बायको बघत नाही, पोटची मुलगी बघत नाही, वासनेच्या भरात तो लिंग पिसाट होऊन बलात्कार करून नात्यातील पावित्र्य कलंकित करत आहे. शाळेतील शिक्षक आपल्याच विद्यार्थिनीवर अमानुष अत्याचार करून गुरु शिष्याचे नाते कलुषित करत आहे. आई वडील शेती नावावर करत नाहीत म्हणून आई-वडिलांना जीवे मारणारे महाभाग या देशात खूप आहेत. थोड्याफार जागेसाठी सख्खे भाऊ एकमेकांचे पक्के वैरी बनून रोज हाणामारी करून घेत आहेत. कोर्टकचेरी व पोलीस स्टेशनला खेटे मारत आहेत आणि अमानुष्यतेचा कळस गाठत आहेत. माणूस एवढा अमानुषपणे का वागतोय? माणूस माणसासारखे वागायचे सोडून रानटी जनावरासारखे का वागत आहे? कळायला मार्ग नाही, पण माझ्या मते आजकालच्या मुलांना आई वडिलांचा जराही धाक राहिला नाही. त्यांच्यावर संस्काराची रुजवण करण्याच्या वयात त्यांचा अतिलाड केला जात आहे. आजकाल हम दो हमारे दो या पद्धतीचा अवलंब केला जात आहे. आणि प्रत्येकजण एकुलता एक वंशाचा दिवा म्हणून त्याचा अतिलाड करून त्याला कसेही मोकाट कुत्र्यासारखे मोकळे फिरू देत आहे. त्याला मनमानी व वाट्टेल तसे जीवन जगू देत आहेत. म्हणून आजकालची मुले बिघडून जात आहेत. शाळेतील शिक्षकांना विद्यार्थ्यांना मारायला अधिकार नसल्यामुळे विद्यार्थी शिक्षकांना जराही घाबरत नाहीत. बरेच विद्यार्थी शिक्षकांना घाण घाण शिव्या देऊन त्यांची मानहानी करत आहेत. जोपर्यंत आई-वडील आपल्या मुलांना धाकात ठेवणार नाहीत, त्यांच्यावर संस्काराची योग्य पेरणी करणार नाहीत आणि शाळेतील शिक्षक जोपर्यंत विद्यार्थ्यांना छडीचा धाक दाखवणार नाहीत तोपर्यंत मुले असे वाईट कृत्य करणारच आहेत. देशात बलात्कार आणि व्याभिचार वाढत जाणार आहे. माणूस माणसासारखे न वागण्याचे एकमेव कारण हेच आहे. आई-वडिलांच्या धाकाला संस्कार म्हणतात तो संस्कार जोपर्यंत विद्यार्थ्यांमध्ये जागा होणार नाही तोपर्यंत विद्यार्थ्यांमध्ये सुधारणा होणार नाही, उलट मुले बिघडत जाणार आहेत. त्यासाठी गरज आहे पालकांनी व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना धाक दाखवून त्यांच्यावर संस्काराची छाप पाडण्याची...आणि माणूस बनून माणसासारखे वागायला शिकवण्याची...



- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी ता.अहमदपूर
जिल्हा लातूर
मो.7498715661

## सोलापुरातील आयटी पार्कच्या विजेसाठी करार अंतिम टप्प्यात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** होटगी (ता. दक्षिण सोलापूर) येथे साकारणाऱ्या आयटी पार्कमध्ये उद्योजकांना हिंजवडीच्या (पुणे) तुलनेत जवळपास निम्म्या दराने जागा मिळणार आहे. स्वस्तात जागा दिल्यानंतर आता स्वस्तात वीज देण्यासाठीही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद प्रयत्नशिल आहेत.

एनटीपीसीने उभारलेल्या २३ मेगा वॅटच्या सौर प्रकल्पातून आयटी पार्कसाठी वीज घेतली जाणार आहे. यासाठी एनटीपीसी आणि जिल्हा प्रशासन यांच्यात आवश्यक असलेला करार सध्या अंतिम टप्प्यात आहे.

महावितरणकडून उद्योजकांना १२ ते १३ रुपये युनिटच्या दरम्यान वीज उपलब्ध करून दिली जात आहे. होटगी आयटी पार्कमधील उद्योजकांना साधारणता ४ ते ५ रुपये युनिट या दरम्यान वीज मिळणार आहे. एनटीपीसी सौर ऊर्जा प्रकल्पातून २३ मेगा वॅट वीजेची निर्मिती करत आहे. यातील १० मेगा वॅट विजेची विक्री झालेली आहे. एनटीपीसीकडे जवळपास १३ मेगा वॅट वीज सध्या शिल्लक आहे. आयटी पार्कला रोज किती विज लागेल, या विजेचा लोड प्रोफाईल कसा असेल, वीजेच्या साठवणुकीसाठी मोठ्या किती बॅटरी लागतील? याचा अंदाज घेतला जात आहे. जिल्हा प्रशासन आणि एनटीपीसी यांच्यात करार झाल्यानंतर होटगी आयटी पार्कमधील उद्योजकांना स्वस्तात वीज मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

> होटगी येथील आयटी पार्कमध्ये येणाऱ्या उद्योजकांना स्वस्तात जागा आणि स्वस्तात वीज देण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. महावितरण पेक्षा कमी दरात एनटीपीसीच्या सौर ऊर्जा प्रकल्पातून वीज उपलब्ध करून दिली जाणार आहे. यासाठी आवश्यक असलेला करार सध्या अंतिम टप्प्यात आहे. येत्या आठ ते १० दिवसात ही प्रक्रिया पूर्ण होईल.
>
> **- कुमार आशीर्वाद,** जिल्हाधिकारी, सोलापूर



जिल्हा प्रशासनाने तयार केलेला आयटी पार्कचा प्रस्ताव एमआयडीसीच्या सीईओंनी मंजूर केला आहे. आता हा प्रस्ताव उच्चाधिकार समितीपुढे गेला आहे. या समितीने प्रस्ताव मंजूर केल्यानंतर हा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी शिखर समितीपुढे जाणार आहे. शिखर समितीची मान्यता मिळाल्यानंतर सोलापुरच्या आयटी पार्कचा शासन निर्णय होईल. हा शासन निर्णय झाल्यानंतर आयटी पार्कच्या भूमीपूजनाचा मार्ग मोकळा होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सोलापुरातील ड्रीम प्रोजेक्ट म्हणून आयटी पार्ककडे पाहिले जात आहे. मुख्यमंत्र्यांचा हा ड्रीम प्रोजेक्ट वेळेत सुरू करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी स्वतः बारकाईने लक्ष घातले आहे.

## प्रबोधन

# कलियुग आले । किती बरे झाले

आरोग्य हीच खरी दौलत ही आरोग्याची व्याख्या आहे. ज्ञान हे अमृत आहे ही ज्ञानाची व्याख्या आहे. आरोग्य, ज्ञान यांच्या आणखी व्याख्या आढळतात. पण कलियुगाच्या व्याख्या फार आढळत नाहीत. संत श्रेष्ठ तुकोबांनी कलियुगाचं वर्णन करताना निंदाव्यंजक शब्दच वापरले आहेत. ते लिहितात, कलियुगामाजी थोर जाले बंड। नष्ट लोक लंड जाले फार - किंवा ऐसे कलियुगाच्यामुळे। जाले धर्माचे वाटोळे- दुसऱ्या एका अभंगात, कलियुगी कवित्व करिती पाषांड। कुशल हे भांड बहु जाले - एकूण कलियुग म्हणजे द्रव्य, दारा (पत्नी) यांच्यासाठी झटणं, गर्व-ढोंग करणं, देहासक्ती बाळगणं! बस्स! याशिवाय काही नाही. ही सारी निंदाच आहे. लोकहितवादी देशमुखही कलियुगाला नावंच ठेवतात, नावाजत नाहीत. ते शतपत्रात लिहितात, 'जे युग सर्वात खालच्या प्रतीचे असून ज्या युगात जास्तीत जास्त भ्रष्ट माणसं वाटेल तसं आचरण करतात व परिणामी, यातना भोगतात, ते कलियुग' स्वामी विवेकानंदही कलियुगावर दोषारोप करताना म्हणतात, 'या युगात पापाची वाढ होत असल्यामुळे त्याला आपण कलियुग म्हणतो.' एकूण कलियुग म्हणजे कलह, भांडणं, संघर्ष इत्यादी.

पण प्रश्न असा आहे की, आमच्या अशास्त्रीय शास्त्रकारांनी जी सत्य, त्रेता, द्वापार अशी कलियुगाच्या आधीची युगं सांगितली ती कलह, संघर्ष, युद्ध, रक्तपातमुक्त होती का? वेदकाळ हा सत्ययुगीन काळ! पण याच काळात चतुष्पाद आणि द्विपादाच्या रक्ताचे पाट यज्ञाच्या बलिवेदीवर वाहवले गेले. 'न्याय-नीतीचा परमोत्कर्ष सत्ययुगात झाला होता,' असा ठणाणा पुराणकार, शास्त्रकार कितीही करोत. पण सत्ययुगाचा नेता मात्र कपटाने वालीचा वध करीत होता. परिणयसूत्रात बांधून घेण्यासाठी आलेल्या लंकाधीशाच्या भगिनीला विद्रूप करून स्त्री दाक्षिण्याला पारखा होत होता.

त्रेतायुग चांगलं म्हणावं तर पितृआज्ञेसाठी मातेचं शिर धडावेगळं करणारा पुत्र नजरेसमोर येतो. ब्राह्मणवर्चस्वाचं स्वैर थैमान घालणाऱ्या या युगाने सत्यनिष्ठ बळीराजासह किती पराक्रमी राजवंश निर्वंश होताना पाहिले कोणास ठाऊक! द्वापारयुगात तरी स्वातंत्र्य, समानता, बंधुभाव होता काय? पुराणकथांचा काल्पनिक विस्तार सोडून कथाबीजं ध्यानात घेतली तरी कलह, संघर्ष, घातपात, जुगार, मद्यपान, फसवणूक, कपटनीती उतास आलेली आढळते.

म्हणूनच सत्ययुगापेक्षा त्रेतायुग, त्यापेक्षा द्वापारयुग बरं असेल! पण कलियुगाइतकं चांगलं युग ह्या जगाने कधी पाहिलं नव्हतं. सत्याग्रह, असहकार आणि अहिंसेने देश गुलामीतून मुक्त करणारे गांधीजी ही कलियुगाने जगाला दिलेली अनमोल देणगी आहे. भूदान मागणारे विनोबाजी, समतावादी मार्क्स, लेनिन, माओ ह्या थोर विभूती कलियुगाने दिल्या. निरीश्वरवादी बुद्ध, महावीर यांच्या नव्या विचारांनी कलियुग झळाळून निघालं आहे. स्वातंत्र्यप्रेमी छत्रपती शिवराय, महाराणा प्रताप, महात्मा फुले, राजर्षि शाहू, डॉ. आंबेडकर ज्या कलियुगाने जगाला दिले, त्या युगाला आपण कसा दोष देणार? विज्ञानाच्या पंखांवर स्वार होऊन सौख्याच्या आकाशाला भिडणारं, मानवतावादाची जपणूक करणारं असं शांतताप्रेमी युग आमच्या श्वासात खेळत असताना आपण जुन्या समजुतींना कवटाळून त्याला निंदावं, हा निर्बुद्धपणा आहे. आज सारं जग धर्म, जात, राष्ट्र, वर्ग, रंग, शासन या साऱ्या कोंडीतून मुक्त होत आहे. एक जग, एक समाज, एक नीती, एक धर्म- मानवता, या साऱ्यातून एक जीवनपद्धती ह्या संकल्पनांजवळ ज्या कलियुगामुळे पोहोचलो आहोत, ते कलियुग वंदनीय आहे. म्हणून-

कलियुग आले । किती बरे झाले ।
जुने जग गेले । विलयाला ॥१
विज्ञानाचा जन्म झाला कलियुगी ।
सुरू झाली सुगी । समृद्धीची ॥२
नव्या विचारांनी मूळ पकडले
जीवनाचे झाले। सोने चोख ॥३
समतेचा वारा सुटला भरारा
विषमता कचरा । उडे दूर ॥४
लोकशाही रुजे । वाढे, फुले, फळे
राजदंड गेले । सम्राटांचे ॥५
स्त्रियांना मिळाले । हरवले हक्क
त्यांनी केले थक्क साऱ्या जगा ।। ६
शांतिस्थापनेचा। वाढला आदर
केला अनादर । युद्धांचा त्या ॥ ७
अशा कलियुगा । करावे वंदन
केले नंदनवन । जगाचे या ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजना आता डिजिटल स्वरुपात

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेह्नचा लाभ आता महाडीबीटी पोर्टलमार्फत थेट ऑनलाईन मिळणार असून, शेतकऱ्यांना तात्काळ मदत पोहोचवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. शेतीत काम करताना होणाऱ्या अपघातांमुळे मृत्यू किंवा अपंगत्व आलेल्या शेतकऱ्यांना ही योजना महत्त्वाची ठरत असून, पूर्वी ऑफलाईन स्वीकारल्या जाणाऱ्या अर्जांची प्रक्रिया आता पूर्णपणे डिजिटल करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतीत काम करताना विविध कारणांमुळे होणाऱ्या अपघातांमुळे शेतकऱ्यांचा मृत्यू किंवा अपंगत्वाच्या घटना राज्यात वारंवार घडतात. अशा घटनांमध्ये शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळावी म्हणून राज्य सरकार १९ एप्रिल २०२३ पासून गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजना राबवत आहे. या योजनेत शेतकऱ्याचा अपघाती मृत्यू झाल्यास २ लाख रुपये तर एक डोळा किंवा एक अवयव कायमस्वरूपी निकामी झाल्यास १ लाख रुपयांची मदत दिली जाते.



पूर्वी या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी किंवा वारसदारांना तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सविस्तर प्रस्ताव आणि आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागत होती. कागदपत्रांतील त्रुटी, पूर्ततेतील विलंब यामुळे अनुदान देण्यास उशीर होत होता. यावर उपाय म्हणून राज्य शासनाने ही संपूर्ण अर्जप्रक्रिया महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन करण्याचा निर्णय घेतला आहे, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

ऑनलाईन अर्जप्रक्रियेमुळे अपघातग्रस्त शेतकरी किंवा त्यांचे वारसदार घराबाहेर न पडता, त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणावरूनच अर्ज भरू शकतील. अर्जाची सद्यस्थितीही महाडीबीटी पोर्टलवर पाहता येणार आहे. पोर्टलवर अर्ज भरल्यानंतर तो थेट कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांच्या लॉगिनवर जाईल. कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यास ती दुरुस्त करण्यासाठी संबंधित शेतकरी किंवा वारसदारांना मोबाईलवर एसएमएसद्वारे सूचना मिळणार आहेत. त्यामुळे शासकीय कार्यालयांच्या चकरा न मारता त्रुटी ऑनलाइनच दुरुस्त करता येतील.

तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडून प्रस्तावांची तपासणी करण्यात येईल आणि तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखालील समिती मंजुरी देईल. त्यानंतर मंजूर अनुदानाची रक्कम थेट डीबीटीद्वारे शेतकरी किंवा वारसदारांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे. २०२५-२६ या वर्षाकरिता या योजनेसाठी १२० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, ४३५९ शेतकरी प्रस्तावांना ८८.१९ कोटी रुपये त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहेत. महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने योजना राबविल्यामुळे प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि शेतकरी केंद्रित होणार असल्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले.

## छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये वर्किंग वुमेन्स हॉस्टेल व ओल्ड एज होम उभारण्याबाबतचा प्रस्ताव सादर करा : डॉ. पंकज भोयर

**छत्रपती संभाजीनगर (कटूसत्य वृत्त):-** शिक्षणातील आव्हाने स्वीकारत गुणवत्तापूर्ण आणि आनंददायी शिक्षण देणारे आयडॉल शिक्षक शाळेसोबत समाजातही मोठा बदल घडवून आणतील,असा विश्वास शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी आज व्यक्त केला. समर्पित भावनेने काम करणाऱ्या शिक्षकांच्या अडचणी सोडविण्यासाठी शासन सदैव त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचेही ते म्हणाले. तापडिया नाट्यमंदिर येथे शालेय शिक्षण व क्रीडा विभागातर्फे आयडॉल शिक्षक एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी शिक्षण मंत्री दादाजी भुसे बोलत होते. यावेळी शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह , राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अंकित, शिक्षण संचालक (योजना) कृष्णकुमार पाटील यांच्यासह राज्यभरातील आयडॉल शिक्षक म्हणून निवड झालेले शिक्षक उपस्थित होते. शिक्षणमंत्री श्री.भुसे म्हणाले, राष्ट्र प्रथम हा शिक्षण पद्धतीचा गाभा आहे, त्या दृष्टीने शासकीय शाळांमध्येही मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा शासन सातत्याने काम करत आहे. त्यादृष्टीने पीएमश्री योजनेच्या धर्तीवर राज्यातही सीएमश्री योजनेच्या माध्यमातून 5 हजार शाळांच्या इमारती बांधण्यात येणार आहेत. त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. नुकतेच युपीएससी स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण झालेले जवळपास 60 टक्के उमेदवार हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेतून शिकलेले आहेत, शासकीय शाळेतून गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते हे यावरून पहावयास मिळते. गरीब विद्यार्थी शिकला तर त्यांच्या कुटुंबाचीही प्रगती होते त्यामुळे शिक्षणाशिवाय पर्याय नाही. बदलत्या काळानुसार आधुनिक शिक्षण देण्यावर आपला भर असणार आहे. विद्यार्थ्यांना परिपूर्ण शिक्षण देण्याचा दृष्टीने शिक्षक भरतीमध्ये कला व क्रीडा शिक्षक भरतीस प्राधान्य दिले जाईल असे ते म्हणाले.

## वात्रटिका

### स्ट्राँग रूम

काय होतंय काय होणार
काहीच कळत नाही...
प्रश्न हजार आहेत पण
उत्तर काही मिळत नाही...
निवडून येणार की नाही
चिंता सतावत आहे...
स्ट्राँग रूम भोवती संशयाचे
वारे घोंघावत आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# कॉलेज ऑफ फार्मसीची अनोखी भेट



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कॉलेज ऑफ फार्मसी (पदविका) या महाविद्यालयाने यंदाच्या वर्षी आपल्या शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील उर्फ बाळदादा यांचा ७६ वा वाढदिवस एक अनोख्या अंदाजात साजरा केला.पंढरपूर येथील हिरा प्रतिष्ठान संचालित पालवी विशेष बालकांचा (एच आय व्ही बाधित) संगोपन प्रकल्प पंढरपूर, येथे डी. फार्मसीच्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी भेट दिली. समाजावर, लहान मुलांवर, दीनदुबळ्यांवर प्रेम करणारे लाडके नेते बाळदादा यांच्याकडून मिळालेल्या सामाजिक दृष्टिकोनातून सुचलेली हि संकल्पना आज डी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी सत्यात उतरवली आहे.अशा सामाजिक कायार्तून महाविद्यालयाने बाळदादांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. बाळदादांच्या वाढदिवसानिमित्त पालवी प्रकल्पातील मुलांना खाऊ वाटप केला व त्या मुलांचा एक दिवस आपल्यामुळे आनंदी होईल यासाठी प्रयत्न केले.

# अमोल शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत पक्ष प्रवेश



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिका निवडणुकीच्या तोंडावर सोलापूर शहरात दिवसेंदिवस अनेक राजकीय घडामोडी घडताना पाहायला मिळत आहेत. सत्तेतील महायुती स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका या स्वबळावर लढवणार असल्याचे जवळजवळ निश्चित झाले आहे. त्यामुळे सर्व पक्ष स्वबळाची भाषा करत आहेत. एकनाथ शिंदे यांची शिवसेना सुद्धा आता तयारीला लागल्याचे पाहायला मिळते. भाजपमधील नाराज असलेल्या नेत्यांवर शिवसेना आपले जाळे टाकत असून अशा नेत्यांच्या हातात धनुष्यबाण दिला जात आहे.

विधानसभा निवडणुकीत पद्मशाली समाजाकडून समाजातील शहर मध्य साठी इच्छुक असलेल्या श्रीनिवास संगा या नेत्याने माघार घेत घेतली होती. आता तोच नेता एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत प्रवेश करत शिवसेनेत गेला आहे. पूर्व भागात संगा यांचे नाव कायमच चर्चेत राहते. त्यामुळे आगामी महापालिकेच्या तोंडावर त्यांनी शिवसेनेत प्रवेश करून निश्चितच महापालिका लढवण्याचे संकेत दिले आहेत.

याचबरोबर शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांच्या उपस्थितीत अशोक चौक भागातील सामाजिक कार्यकर्ते दत्ता पवार, आनंद विटकर, व लक्ष्मण पवार यांनी त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांसोबत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केले, याप्रसंगी उपजिल्हाप्रमुख तुकाराम मस्के, युवानेते श्रीनिवास संगा, कामगार सेना जिल्हाप्रमुख सायबन्ना तेगेळी, सचिन जवळकर उपस्थित होते.

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात दत्तजयंती साजरी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली श्री दत्तजयंती निमित्त गुरुवारी सकाळी विविध धार्मिक कार्यक्रमानंतर शेकडो स्वामी भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला, न्यासाकडून सुरु असलेल्या समर्थ महाप्रसाद सेवेला ४ वर्ष पूर्ण झाल्याचे औचित्य साधून २६५ लाभार्थ्यांना स्वेटर वाटप करण्यात आले. गेली ४ वर्षे 'समर्थ महाप्रसाद सेवा' हा उपक्रम स्वामीकृपेने अविरतपणे सुरु आहे.

दरम्यान स्वामी भक्त देणगीदार यांच्या हस्ते महानैवेद्य, आरती संपन्न झाल्यानंतर महानैवेद्याचा संकल्प सोडण्यात आला. यासह न्यासाने सुरु केलेल्या समर्थ महाप्रसाद सेवेला श्रीदत्त जयंतीच्या या दिवशी ४ वर्ष पूर्ण झाले असून, दररोज २६५ निराधार, दिव्यांगांना दोन वेळचा ह्यसमर्थ महाप्रसादह्व डबा घरपोच दिला जातो. यंदा सदरच्या लाभार्थ्यांना थंडीचे वाढते प्रमाण पाहता सवार्ना स्वेटरचे वाटप सिने अभिनेते अक्षय मुदवाडकर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालक मनोजकुमार लोहिया हे उपस्थित होते.

यावेळी श्री शितोळे बाबा ट्रस्ट घाटकोपर (पूर्व), मुंबई येथून आलेल्या पालखीचे स्वागत अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांनी केले.

या कार्यक्रमास पोलीस निरीक्षक दिपक भिताडे उत्तर पोलीस ठाणे, न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, रामचंद्रराव घाटगे, मनोज निकम, अप्पा हंचाटे, सनी सोनटक्के, मुख्य लेखापरीक्षक ओंकारेश्वर उटगे, डॉ. प्रसाद प्रधान, सौरभ मोरे, सिद्धेश्वर मोरे, रोहित खोबरे, बाबू मसुती, निखील पाटील, प्रवीण घाडगे, प्रदीप सलबत्ते, प्रवीण बाबर, विजय माने, ज्ञानेश्वर भोसले, राहुल इंडे, मल्लिकार्जुन बिराजदार, प्रसाद मोरे, सुमित घाडगे, छोटू फडतरे, आकाश गडकरी, रोहन नंदने, काशिनाथ चिंचोळकर, नाथाभाऊ भजनावळे, मयुरेश माणकेश्वर, भिमाशंकर गवळी, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, सोमकांत कुलकर्णी, विश्वंभर पुजारी, सिद्धाराम कल्याणी, एस.के.स्वामी, बाळासाहेब पोळ, सतिश महिंद्रकर, नामा भोसले, शहाजीबापू यादव, बाळासाहेब घाडगे, गोरख माळी, रामचंद्र समाणे, योगेश कटारे, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, धनंजय निंबाळकर, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, रमेश हेगडे, राजू पवार, गोविंदराव शिंदे, महादेव अनगले, मल्लप्पा कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, प्रतिक लांडगे, चंद्रकांत कुंभार, सागर जाधव, विपुल कदम, रोहित कदम, किरण साठे, साहिल सय्यद, समर्थ शिंदे, काशिनाथ वाले, व निर्धारित वेळेत लाभार्थ्यांना डबा पोहच करणारे सेवेकरी अतिश पवार, मारुती बोरकर, अप्पाशा मलवे, शेखर कांबळे, संतोष मोरे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.



**राज्याच्या धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य :**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाचा विविध क्षेत्रातील अफाट कार्य व परिसरातील विकासाने श्रीक्षेत्र अक्कलकोटच्या वैभवात भर पडत असून, धार्मिकते बरोबरच सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्रीडा या क्षेत्रात राज्याच्या धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य आहे. उत्तोरोत्तर अन्नछत्र मंडळाची प्रगती होतच राहील अशा शुभेच्छा माझ्याकडून देत आहे.

**- सिने अभिनेते अक्षय मुदवाडकर,**
श्री स्वामी समर्थांची भूमिका साकारणारे

**समर्थ महाप्रसाद लाभार्थ्यांना स्वेटर वाटप :**

गेल्या वर्षभरापासून न्यासाकडून दररोज २६५ निराधार, दिव्यांगांना दोन वेळचा समर्थ महाप्रसाद डबा घरपोच दिला जातो. अशांनकरिता गुरुवारी श्रीदत्त जयंती निमित लाभार्थ्यांना महाप्रसादा बरोबरच स्वेटर वाटप करण्यात आले. सदर लाभार्थ्यांना शहरातील विविध ठिकाणाहून वाहनांच्या माध्यमातून अन्नछत्र मंडळात आणण्यात आले.

**अविरत सेवा :**

अक्कलकोट शहरातील गरजू, वृद्ध, दिव्यांग, निराधार लोक आम्ही या अगोदर उपाशी राहून दिवस काढलो आहोत, ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता सेवेकाऱ्यानी सण, वार, उत्सवाच्या काळातही 'समर्थ महाप्रसाद' सेवा ही अविरत गेल्या ४ वर्षापासून सुरु आहे. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले हेच आमचे आधारवड असून, या सेवेबरोबरच आपुलकीचे नाते, काळजी आमची घेत असल्याचे लाभार्थी रत्नाबाई बनसोडे, शरीफ मुल्ला, पार्वती ऐवळे, ललिता होटकर यांनी याप्रसंगी सांगितले.

**समर्थ महाप्रसाद सेवा :**

'समर्थ महाप्रसादह्व सेवेने गेल्या ४ वर्षात मोठा टप्पा पार केला असून २६५ जणांना सकाळी व संध्याकाळी पुरेल असा घरपोच डबा देण्यात येत आहे. बाहेरून आलेल्यांची अन्नछत्राच्या माध्यमातून सेवा केली जाते. परंतु श्री क्षेत्र अक्कलकोटातील निराधार, दिव्यांगांना आधार मिळावा म्हणून ही सेवा सन २०२१ च्या दत्त जयंती पासुन सुरु असल्याचे न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांनी सांगितले.

# दिव्यांग बांधवांच्या आरोग्यासाठी सोलापूर महापालिकेची हातभर मदत




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दिव्यांग लाभार्थ्यांच्या आरोग्यवृद्धी आणि पुनर्वसनासाठी सोलापूर महानगर पालिका, कामगार कल्याण दिव्यांग विभाग व आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित फिजिओथेरपी शिबिर आज यशस्वीपणे पार पडले. कार्यक्रम मा. आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या निर्देशांनुसार आणि अती. आयुक्त वीणा पवार यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आला.

शिबिराचे नेतृत्व कामगार कल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे यांनी केले. महापालिका भौतिकोपचार केंद्र, जोडबसवण्णा चौक येथे सकाळी १० ते सायं. ५ या वेळेत दिव्यांग लाभार्थ्यांची फिजिओथेरपिस्ट आणि ऑक्युपेशनल थेरपिस्ट यांच्या मार्गदर्शनाखाली तपासणी व उपचार करण्यात आले.

**शिबिरात :**

- सांधेदुखी, स्नायू तक्रारींसाठी उपचार
- चालण्यास व हालचाल सुधारण्यासाठी तंत्रांचे मार्गदर्शन
- पुनर्वसनविषयक समुपदेशन
- विविध व्यायामांचे प्रात्यक्षिक

तसेच दिव्यांग व दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी व्हीलचेअर, श्रवणयंत्रे, काठी, वॉकर, ब्रेसेस यांसह आवश्यक साहित्याचे मोफत वितरण करण्यात आले. लाभार्थ्यांनी उपक्रमाबाबत समाधान व्यक्त केले.

कामगार कल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे म्हणाले, 'मा. आयुक्त डॉ. ओम्बासे आणि अती. आयुक्त पवार यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांगांसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. पुढेही हे उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात सुरू राहतील.'

या प्रसंगी शिक्षण अधिकारी मल्हारी माने, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. अरूंधती हराळकर, फिजिओथेरपिस्ट डॉ. आदित्य झिपरे, ऑक्युपेशनल थेरपिस्ट डॉ. प्रवीण राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.

समारोपावेळी आयोजकांनी अशा उपक्रमांमुळे दिव्यांग बांधवांचे आत्मविश्वास, स्वावलंबन आणि पुनर्वसनाला चालना मिळत असल्याचे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशेष शिक्षक समन्वयक अविनाश शिंदे यांनी केले.

# विवेक कॉलेजमध्ये बुरखा बंदीविरोधात AIMIM चे आंदोलन




**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** गोरेगाव येथील विवेक कॉलेजमध्ये बुरखा वापरण्यावर करण्यात आलेल्या बंदीच्या निषेधार्थ आज AIMIM मुंबईचे अध्यक्ष जनाब हाजी फारूक भाई शाब्दी यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात पक्षाचे कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते तसेच विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

कॉलेज प्रशासनाने लादलेल्या बुरखा बंदीस विरोध म्हणून भूक हडताल देखील सुरू करण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले की, हा मुद्दा केवळ एका लिबासाचा नाही, तर देशातील प्रत्येक नागरिकाच्या पहनण्याच्या स्वातंत्र्याचा, वैयक्तिक अधिकारांचा आणि संविधानाने दिलेल्या समानतेच्या हक्काचा आहे.

हाजी फारूक भाई शाब्दी यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, 'भारताचे संविधान प्रत्येक नागरिकाला व्यक्त होण्याचे आणि आपल्या श्रद्धेनुसार जगण्याचे स्वातंत्र्य देते. बुरखा बंदी हा त्या मूलभूत हक्कांवर अन्यायकारक घाला आहे. आम्ही हा निर्णय तत्काळ मागे घ्यावा, अशी ठाम मागणी करतो.'

आंदोलनकर्त्यांनी कॉलेज प्रशासन आणि शासनाला विनंती केली की असे निर्णय सामाजिक तणाव वाढवू नयेत म्हणून तातडीने पुनर्विचार करण्यात यावा. विद्यार्थी आणि पालक वर्गानेही या आंदोलनाला पाठिंबा दर्शवून प्रशासनाने संवाद साधून मार्ग काढावा अशी मागणी केली.

AIMIM च्या पदाधिकाऱ्यांनी इशारा दिला की, मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र केले जाईल.

# दुष्कर्म केल्याप्रकरणी नृत्य शिक्षकास कोल्हापूर उच्च न्यायालयातून जामीन मंजूर - ॲड. रितेश थोबडे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर येथील अल्पवयीन पीडीतेवर दुष्कर्म केल्याप्रकरणी नृत्य शिक्षक विशाल दिगंबर पाटोळे राहणार पंढरपूर यास कोल्हापूर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. शिवकुमार दिघे यांनी जामीन मंजूर केला.

यात हकीकतअशी की पीडिता ज्या गल्लीत राहात होती तिथे डान्स शिकवणारा डान्स टीचर विशाल पाटोळे हा पीडितेस डान्स क्लास साठी बोलवत असे व ते दोघे इंस्टाग्राम वर चॅटिंग करत असत. एप्रिल 2023 मध्ये वाढदिवसासाठी त्याने पीडितेस घाटावर बोलवले होते. त्यावेळी त्याने लग्न करतो म्हणून दुष्कर्म केले त्यानंतर देखील दोन ते चार वेळा दुष्कर्म केले. पीडितेचे डोके दुखत असल्यामुळे तिच्या आईने तीस डॉक्टरांकडे उपचारासाठी घेऊन गेली होती. त्यावेळी डॉक्टरांनी ती गरोदर असल्याचे सांगितले त्यावर पीडीतेस तिच्या आईने विश्वासात घेऊन विचारले असता तिने वरील हकिकत सांगितली. त्यावर पीडितेच्या आईने पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती त्यावरून विशाल पाटोळे यास अटक झाली होती.

आपणास जामीन मिळावा म्हणून विशाल याने जिल्हा व सत्र न्यायालयात पंढरपूर येथे जामीनाचा अर्ज दाखल केला होता तो अर्ज न्यायालयाने फेटाळला होता त्यावर विशाल याने आपणास जामीन मिळावा म्हणून कोल्हापूर उच्च न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता.

अर्जाच्या सुनावणी वेळी ॲड. रितेश थोबडे यांनी आपले युतीवादात घटनेची फिर्याद उशिराने आहे तसेच गुन्ह्याचा तपास हा पूर्णत्वात आल्या असल्याचे मुद्दे मांडले ते ग्राह्य धरून न्यायाधीशांनी वीस हजार रुपयाच्या जात मुचुलक्यावर जामीन मंजूर केला

यात अर्जदार तर्फे ॲड. रितेश थोबडे, ॲड. किरण सराटे यांनी तर सरकारतर्फे एस एस चौधरी यांनी काम पाहिले.

# मृण्मयी गायकवाड ची राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सोलापूर महानगरपालिका व पुणे जिल्हा सॉफ्ट टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या वयोगट 14 वषार्खालील राज्यस्तरीय आंतरशालेय सॉफ्ट टेनिसस्पर्धेमध्ये नागेश करजगी ऑर्किड स्कूलची कुमारी मृण्मयी गायकवाड हिने सांघिक खेळात गोल्ड मेडल तर वैयक्तिक खेळात



सिल्वर मेडल प्राप्त करत राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये वर्चस्व गाजवत होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्रता सिद्ध केली.

मृण्मयी गायकवाड हिला शाळेचे क्रीडाशिक्षक आनंदी लिगाडे व ज्ञानदीप जाधव तसेच प्रशिक्षक महेश झांबरे यांचे मार्गदर्शन लाभले.

शाळेचे संस्थापक अध्यक्ष डॉक्टर कुमार दादा करजगी, सचिवा सौ वषार्ताई विभुते, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, शाळेच्या प्राचार्या सौ रूपाली हजारे आणि मार्गदर्शिका सौ मीना पारखे यांनी यशस्वी मृण्मयी गायकवाड हिचे अभिनंदन केले.

# सर्वसामान्यांसाठी मोफत व गुणवत्तापूर्ण उपचारांची हमी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत गरजू रुग्णांना मोफत वैद्यकीय उपचार व शस्त्रक्रियांचा लाभ मिळत आहे. या योजनेत प्रति कुटुंब प्रति वर्ष रु. 5 लक्ष पर्यंतचे विमा संरक्षण उपलब्ध असून एकूण 1356 प्रकारच्या उपचारांचा समावेश आहे. मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी स्वतंत्रपणे रु. 4.5 लक्ष पर्यंतचे संरक्षण दिले जाते. तसेच रस्ते अपघातग्रस्तांना प्रति व्यक्ती, प्रति अपघात रु. 1 लक्ष पर्यंतचा लाभ मिळतो, अशी माहिती या योजनेचे जिल्हा समन्वयक प्रवीण गुंजाळ यांनी दिली आहे. महाराष्ट्र शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत राज्यातील शिधापत्रिका धारक, अधिवास प्रमाणपत्रधारक, बांधकाम कामगार, पत्रकार, अपंग, अनाथ आश्रम व वृद्धाश्रमातील रहिवासी, तसेच महिला व बालविकास विभागाच्या वसतिगृहातील लाभार्थ्यांना मोफत व गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली जात आहे.

या योजने अंतर्गत कॅन्सर, हृदयविकार, यकृत व मूत्रपिंड विकार, मेंदू व मज्जासंस्था, नवजात बालकांचे आजार, अपघातातील शस्त्रक्रिया, हाडांचे विकार, स्त्रीरोग, नेत्ररोग, कान-नाक-घसा विकार, फुफ्फुस व पचनसंस्थेचे आजार, मानसिक आजार हृदयविकारासंबंधीत शस्त्रक्रिया एन्जोप्लास्टी बायपास सर्जरी व किडनी संदर्भातील मुतखडे प्रोस्टेट ग्रंथीचे आजार व डायलिसिस अशा एकूण १३५६ उपचारांचा लाभ घेता येतो.

योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड, शिधापत्रिका, अधिवास दाखला, ओळखपत्र, शाळा दाखला किंवा पत्रकारिता आयोगाचा दाखला आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी www.jeevandayee.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा १५५३८९ / १८००२३३२२०० या निःशुल्क क्रमांकावर संपर्क साधावा, असे आव्हान गुंजाळ यांनी केले.

# दत्त जयंती निमित्त सामाजिक सलोखा- महारुद्र परजणे



पोलीसांचे सामाजिक व धार्मिक उपक्रमांतील सहभाग लोकांशी नाते अधिक मजबूत करण्यासाठी आवश्यक असल्याने या उपक्रमातून सामाजिक एकोपा आणि सदभावनेचा संदेश समाजात जात असतो
**- महारूद्र परजणे** (सपोनि नातेपुते पोलीस ठाणे)

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील नातेपुते गावात पोलीस स्टेशन व दत्त प्रतिष्ठान यांच्या वतीने पोलीस स्टेशन व परवतेश्वर मंदिर याठिकाणी दत्त जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या उत्सवात पोलीस दल आणि सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन समाजसेवा व धार्मिक सलोख्याचा आदर्श घालून दिला. दत्त जयंतीच्या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पहाटेपासून भाविकांनी श्री दत्त महाराजांच्या पादुका दर्शनासाठी गर्दी केली. सकाळी मूर्ती व पादुकांचे अभिषेक पार पडले आणि मान्यवरांच्या हस्ते महाआरती झाली. दुपारी श्री दत्त चरित्र ग्रंथाचे वाचन आणि सामुदायिक भजन झाले, ज्यात स्थानिक भक्तांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. सायंकाळी फुलांची पुष्पवृष्टी झाली. त्यानंतर दत्तगुरुचा पाळणा होऊनआरती करण्यात आली. आरतीनंतर उपस्थित सर्व भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी दोन्ही ठिकाणी शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

या कार्यक्रमास नातेपुते पोलीस स्टेशनचे अधिकारी कर्मचारी, प्रतिष्ठानचे पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## पाहिजेत

दैनिक सोलापूर कटूसत्य www.katusatya.in
सोलापूर वृत्तदर्पण न्यूज चॅनल

सोलापूर वृत्तदर्पण व दैनिक कटूसत्य या माध्यमांच्या वतीने एक अभिनव व अनोखी योजणा राबविण्याचा संकल्प आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कायम पगारावर खालील पदे भरावयाची आहेत. या करीता सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा या तालुका परीसरात एक प्रतिनिधी नेमणे आहेत. ही योजणा यशस्वी करण्यासाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | लिंग | पगार/मानधन व कमिशन (मासिक) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | व्यवस्थापक | २ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १५००० ते २०००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| २) | सहाय्यक व्यवस्थापक | ४ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १०००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| ३) | सह संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ४) | उप संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ५) | पत्रकार / वार्ताहर | २५ | १२ वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ६) | कॅमेरामन | २५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ७) | मार्केटींग प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ८) | जाहिरात प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ९) | प्रशिक्षण अधिकारी | १ | एम. बी.ए. / पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| १०) | वसूली प्रतिनिधी | ५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |

**नियम व अटी :-** १) इच्छूक उमेदवारांनी आपल्या स्वहस्ताक्षरात संपूर्ण माहिती असलेला अर्ज भरुन, त्या सोबत शाळेचा दाखला, मार्कलिस्ट, भारतीय असल्याचा पुरावा, दोन फोटो जोडून, खालील पत्त्यावर १५ दिवसाच्या आत आणून द्यावे. २) वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण ते ४५ वर्षापर्यंत, एक उमेदवार दोन पदासाठी अर्ज करु शकतो. ३) सर्व अधिकार वृत्तदर्पण कडे राखीव राहतील आणि ते अर्जदारांवर बंधनकारक राहतील. वृत्तदर्पण चा निर्णय अंतिम राहील. ४) सदरच्या नियुक्त्या केवळ मुलाखती घेवूनच केल्या जातील. आमच्या व आपल्या वेळेनुसार मुलाखत घेतली जाईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी. ५) अर्ज स्वीकारण्याची वेळ रविवार सोडून सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत. ६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ७) स्वतःचे वहान असणाऱ्यास प्राधान्य.

**मो.9657069069**

संपर्क :- वृत्तदर्पण कार्यालय, एफ-३, वृंदावन पार्क, चेतन फौन्ड्रीसमोर, होटगी रोड, सोलापूर-३.